म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५५८

REFBK-0020309
REFBK-0020309

REFBK 0020309

REFBK-0020309

ग्रं प्रवास ५५९
.ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ५५९

ोन शब्द

ोसायटीच्या सोनई हायस्कूलमध्ये
ा श्री. सातवळेकर" यांनीं आपल्या
"दैवतांका"साठीं महाराष्ट्रांतील
क्तीपूर्ण असें लेख पाठविण्या-
नीलाजनसमाभासं रविपुत्रं केली होती. त्यांच्या
छायामार्तंडसंभूतं तं नमामि श॥ हेतूनें सोनईच्या
ी शनिदेवा"
क घेऊन
या

## जागृत देवस्थान

# श्री शनिश्वर शिंगणापूर

प्रथमावृत्ती ५०००

प्रकाशक : बाबूराव संगप्पा यन्नाल C/o, महाराष्ट्र उदबत्ती निकेतन
२९३१, जुना मंगळवार बाजार, अहमदनगर

मुद्रक. शरच्चन्द्र भाऊराव कवडे आनंद मुद्रणालय,
चितळे रोड, अहमदनगर.

अल्प मूल्य 10 नये पैसे

卐

(उत्पादक सोमाणी ... अहमदनगर)

गॅरन्टीचा पक्का रंग ★ ★ भरपूर लांबीरुंदी

...ण टिकाऊ

**आझाद चौक, अ'नगर.**

सर्व प्रकारचे सुती, वुलन व रेशमी कापड

## सारडा क्लॉथ स्टोअर

**सारडा लेन, अहमदनगर.**

कोईमतुर, दिंडीगल, कांजीवरम्, इचलकरंजी
शिवसंभव व प्रिंटेड

**साड्यांचा लेटेस्ट डिझाईनचा भरपूर स्टॉक**

गु पत्रिका . ५५९

# दोन शब्द

अहमदनगर एज्यु. सोसायटीच्या सोनई हायस्कूलमध्ये शिक्षक असतांना "पंडीत श्री. सातवळेकर" यांनीं आपल्या "पुरुषार्थ" मासिकाच्या "दैवतांका"साठीं महाराष्ट्रांतील दैवतांची थोडक्यांत पण माहितीपूर्ण असें लेख पाठविण्या-बद्दल वर्तमान पत्रांतून जाहीर विनंती केली होती. त्यांच्या सत्कार्याला थोडाफार हातभार लावावा या हेतूनें सोनईच्या पंचक्रोशींत असलेल्या **शिंगणापूर** येथील **"श्री शनिदेवा"** बद्दल माहिती त्या गांवांतील वृद्ध पुढाऱ्यांची बैठक घेऊन व सोनई येथील श्री. काकासाहेब राजहंस, बी.ए एल.टी. या वृद्ध व विद्वान पुढाऱ्यानीं दिलेल्या टिपणांवरून संकलित करून या जागृत देवस्थानाबद्दलचा लेख त्या मासिकासाठीं पाठविला. त्या देवस्थानाबद्दल बरीच नवीन माहिती वाचकांना मिळाली व त्यामुळें बऱ्याच लोकांना त्या देव-स्थानाबद्दल आस्था वाटूं लागली.

माझें चिरपरिचित मित्र **श्री. बाबुराव यंगल** उदबत्ती कारखानदार हे एक कळकळीचें हिंदु धर्म सेवक आहेत. त्यांनीं त्या लेखाची एक छोटी पुस्तिका काढून ती नाममात्र किंमतीला विकून धर्माबद्दल नेहमीच उदासीन असणाऱ्या बांधवांना या जागृत देवस्थानाच्या परिसरांत आणून जागृतीचें कार्य केल्याबद्दल धन्यवाद देणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं.

२०३०९

शनिवार ९-११-६२
केशव निवास
अहमदनगर.

आपला नम्र
मो. मा. देवस्थळी

# प्रकाशकाचें ! ! !

१८८५ कार्तिक वद्य ३०
ता. १६-११-१९६३

आपणापुढें श्री शनिश्वर ( शिंगणापूर ) येथील जागृत देवस्थानाची माहिती पुस्तीका सादर करण्यास मला अत्यंत आनंद होत आहे.

मी प्रकाशक नाहीं किंवा त्या क्षेत्रांतील कांहींच ज्ञान मला नाहीं. केवळ हिंदु देवस्थानाची संकलीत माहिती प्रसिद्ध करून आपल्या धर्मा विषयीचे ज्ञानाचा प्रसार करण्याच्या हेतुनेच मी हे धाडस केलें आहे.

" पुरुषार्थ " मासिकांत आपल्या देवस्थानाची बरीचशीं माहिती खास " देवता अंक " काढून प्रसिद्ध करण्यांत आली आहे. व त्यांतच श्री, शनिश्वर शिंगणापूर ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील माहिती आपणा सर्वांचे परिचयाचे व आवडते श्री. गो. मा. देवस्थळी सर यांनीं लिहिलेली वाचण्यांत आली व ती पुनश्च मुद्रीत करून पुस्तक रूपानें प्रसार करण्याच्या उद्देशानें ही पुस्तिका काढली आहे.

याकामीं मला श्री. देवस्थळी सरांनीं आनंदानें परवानगी दिली तसेच पुरुषार्थ मासिकाचीही सम्मती देण्याची व्यवस्था केली आणि या प्रकाशनार्थ मला आर्थिक व हार्दिक सहाय्य श्री. उत्तमराव सुपेकर, श्री. बनशीशेट बोगावत, श्री. जी. एन. विद्ये, श्री, द. गो. देशपांडे श्री. नागनाथ का. जिक्के तसेच श्री. नानासाहेब गणेश दारवेकर श्री. दादासाहेब देशपांडे, श्री. अशोकराव चांदेकर यांनीं मला उत्तम प्रकारचें मार्गदर्शन केले त्यांचा मी आभारी आहे. तसेच मुद्रणानें काम व्यवस्थित वेळेंवर करून दिल्याबद्दल श्री. पोपटराव कवडे " आनंद मुद्रणालय " व्यवस्थापक व कामगार बंधूंचे व श्री. मुथ्था गुलाबराव आर, या सर्वांचे मी हार्दिक आभारी आहें,

मला या कार्यात बऱ्याचशा व्यापारी वर्गानें जाहिराती देऊन सक्रीय सहाय्य केले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. जागे अभावी बऱ्याचशा जाहिराती स्विकारतां आल्या नाहींत त्याबद्दल दिलगीर आहे.

या माझ्या छोटयाशा प्रयत्नानें हिंदु बांधवांत धर्म जागृती होऊन आपली असंख्य देवस्थाने आज विस्कळींत व अदृश्य आली आहेत त्यांच्या पुर्नरचनेचे काम होवो हीच परमेश्वराच्या चरणीं नम्र प्रार्थना करीतो,

महाराष्ट्र उदबत्ती निकेतन
३९३१ जुना मंगळवार
अहमदनगर.

आपला नम्र सेवक

**बाबूराव संगप्पा यंगल**

उंच प्रतीची सुवासिक
म्हैसूर अगरबत्ती
विक्रेते बी.एस. यंगल
अहमदनगर

# सुदर्शन प्रिंटिंग प्रेस

सुदर्शन चेंबर्स
अहमदनगर

(मालक :- विलास जी. मुथा पारशाखुंट अहमदनगर.)

## — रेणाविकर —




यांची स्पेशल
कातरलेली गावराण
तंबाखु पुडी वापरा!

तसेच

अकोट तंबाखु
चिलम व मशेरीसाठीं
वापरा!

प्रोप्रायटर — जे. एस. रेणाविकर

गंजबाजार, अहमदनगर.

फोटो काढण्याचें एकमेव ठिकाण

## चंद्रशेखर आर्ट स्टुडिओ

आडते बाजार, अहमदनगर.

कलापूर्ण ★ उत्कृष्ट ★ आकर्षक

पुष्पाल के. नरसु ॲण्ड सन्स

भू:प्रवास


संसारोपयोगी अद्ययावत वस्तूं



तांबे, पितळ व
स्टेनलेस स्टीलची
सुबक व घाटदार भांडी

*

भेट देण्यालायक
सुंदर व आकर्षक वस्तूं

*



मेसर्स,
रमेश
मुरलीधर
अंभोरे वांबोरीकर
शहाजीरोड,
अहमदनगर.

योग्य भावांत आर्डरप्रमाणें
माल बनवून देऊ.




"उत्तम प्रतीचें पातळाचे प्रतीष्ठीत निर्मिते"

"आनंद साडी"

प्रोप्रायटर – बुरा ब्रदर्स

हातमाग फॅन्सी पातळाचे व्यापारी

३९७२, तट्टी दरवाजा, अहमदनगर.

२०३०९

जगांतले दहावे आश्चर्य --

# श्री शनीश्वर शिंगणापूर

लेखक -- श्री. गोपाळ माधव देवस्थळी,
शिक्षक 'श्री शनीश्वर विद्यालय' सोनई

## निवासस्थान

अहमदनगर जिल्हा ही 'संतांची पवित्रभूमि' म्हणून साधारणपणें तेराव्या शतकापासून प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यांत नेवासे येथें श्री. ज्ञानेश्वर महाराजांनीं आपली अमर कृति 'ज्ञानेश्वरी' लिहिली, त्याच तालुक्यांत सोनई गांवापासून पूर्वेस तीन मैलावर शिगणापूर म्हणून एक वाडीवजा खेडें आहे. त्या ठिकाणी 'श्री शनिदेवा' चें स्वयंभू स्थान आहे. अहमदनगरहून सोनई २८ मैल असून एस टी. बसची सोय उत्तम आहे, तेथून शिंगणापूरला जाण्यासाठीं कच्ची सडक आहे.

## शनीची मूर्ती

हि मूर्ति म्हणजे एक काळा पाषाण असून, सुमारे ५॥ फूट उंच आहे. हें स्थान स्वयंभू आहे याचा खुलासा—सुमारे १५० वर्षापूर्वी जवळ असलेल्या 'पानस' ओढ्याला एकदां पूर आला आणि त्या पूरांतून ही शिळा वाहत आली. गुराखी मुलें तेथें होती. त्यांनी खेळतां खळतां शिळेला हातांतील काठ्या टोंचल्या त्याबरोबर त्या भागांतून रक्त वाहूं लागले. ही हकीगत वडील माणसांना सांगितली, तेव्हां माणसें जमा झाली. लगेच त्याच रात्री तेथील वस्तीवर असलेल्या एका भाविक गृहस्थाला स्वप्नांत सांगी झाली 'मी शनिदेव आमक्या ठिकाणी आलो आहे मला घेंऊन जावे व तुझ्याजवळ माझी स्थापना करावी.' त्या गृहस्थानें इतर लोकांना सांगून देवाला आणण्यासाठीं गाडी बैल जोडचा वगैरे तयार ठेवल्या. कितीतरी लोकांनीं ती शिळा उचलून गाडीत ठेवण्याची शिकस्त केली पण ती तसुभरसुद्धां जागची हलली नाहीं. निराश होऊन जमलेले लोक परत आले.

## दृष्टांत


'कुणीतरी मामाभाचे असलेल्या दोन लोकांनीं मला काठ्याच्या फासावर लोटून, दोन काळ्या बैलांच्या जोडीनें मला तिथें न्यावे (सध्यां मूर्ति आहे तीच जागा) मग मी मोठ्या खुशीनें येईन. माझी स्थापनाही 'मामाभाचे' यांनीच करावी.' त्या प्रमाणें वस्तीवरच्या लोकांनी व्यवस्था करून ती मूर्ति तेथें आण ी आहे. पूर्वीं कित्येक दिवसपर्यंत, ती मूर्ति जमिनीतच उभी होती. त्याच्या भोंवती हल्ली बांधलेला तसला ओटा वगैरे कांहीं नव्हता. त्यावेळीं मूर्तिची ऊंची ५।। फूट होती.

आतां दिसतो तो चौथरा, सोनई येथील श्री. शेठ जव्हारमल लोढा यांनीं बांधला. आपल्याला पुत्र झाल्यास आपण मूर्तीच्या सभोवती चौथरा बांधू असा त्यांनी नवस केला होता. त्याप्रमाणें त्यांचीं मनीषा पूर्ण झाली व त्यांनीं चौथऱ्याचे काम सुरूं केले.

वरील शेटजींना कुणी असा सल्ला दिला कीं चौथरा बांधून त्यावर ती मूर्ती उचलून ठेवावी. म्हणून मूर्ती जमिनींतून वर काढण्याची खटपट सुरूं झाली जितकी उंची वर आहे, तितकेच खाली खोल खणलें, तरीसुद्धां मूर्ती तितकीच, किंबहुना त्याच्या पेक्षांही खोल अखंडशीलेच्या स्वरुपात असल्याचे आढळून आले. अर्थात मूर्ति उचलून ठेवण्याची सूचना विफल ठरली... 'माझ्या भोंवतींच चौथरा बांधा. मला हालविण्याच्या... उचलण्याच्या फंदांत पडूं नका.' असा दृष्टांत झाला व नंतर चोफेर चौथरा बांधला, तरीसुद्धां मूर्तीची उंची पूर्वीइतकीच म्हणजे ५।। फूट आहे.

## सम्भवामि युगे युगे

सुष्टांचें रक्षण व दुष्टांचें निर्दालन यासाठीं वचनापूर्तीसाठींच की काय कोण जाणें... ही शनिमहाराजांची स्वारी, शिंगणापूरच्या लगतच, तळपत्या उन्हांत कडक थंडीत, भर पावसाळ्यांत मस्तकांवर कोणतेही छत्र न घेतां—बळीराजाच्या द्वारपालाप्रमाणें आज कित्येक वर्षे खडी आहे. मूर्तीवर छप्पर बांधण्याचे प्रयत्न झाले . पण स्वप्नांतूनच 'मला निवारा किंवा छत्रछाया यांची गरज नाहीं' असें निक्षून बजावण्यांत आलें. इतकेच नव्हे... तर शेजारी असलेल्या लिंबाच्या झाडाच्या फांद्या वाढून जर मूर्ती




फोन नं. ३५१

## शेतकऱ्यांस खुष खबर

**शेतकऱ्यांचे आवडते लहान साईजचे ५।६ चे रस्टन इंजीन्स आता मिळूं लागली आहेत.**

जगप्रसिद्ध रस्टन इंजिन्स ५।६ ११।१४।१८ व डिलक्स पट्टे, जर्म ऑईल, इंडियामन किर्लोस्कर तसेच सर्व प्रकारच्या इंजिनच्या सुटचा भागांचे प्रमुख विक्रेते. तसेच पिकांवरील गायगीच्या

....औषधाचें स्टॉकिस्ट......

# ऑग्रिकल्चरल इंजिनिअरिंग कार्पोरेशन:

# प्रो. निंबाळकर लगड आणि कंपनी

(शिवाजी रोड, श्रीरामपूर) (सेंट्रल बँक रोड, अहमदनगर)

पु ण्या ची

## शेठ हरिभाई देसाई

या ची स्पे श ल फ र्मा स

## लवंगी विडी ओढा

ती कडक व मधूर असते सर्वत्र मिळते.

ब्रँच : ३३७०, नवीपेठ अहमदनगर.

## आझाद स्टोअर्स ★ ● ★

कॅप अँण्ड रेडिमेड स्टोअर

महात्मा गांधी रोड, अहमदनगर.

प्रोप्रा. — के. एन. विद्दे

॥ श्री मार्कंडेय प्रसन्न ॥

## प्रकाश साडी

किरकोळ व ठोक हातमाग पातळाचे व्यापारी

मेसर्स चंद्रय्या मल्लय्या अनगल

३८९७-९८ आशा टॉकिजमार्गे, अहमदनगर.

वर सांवली पडूं लागली तर तेवढी फांदी आपोआप तुटून बाजूला पडते. हा चमत्कार पहाणारे लोक अद्याप शिंगणापूरला ह्यात आहेत.

## एक अद्‌भूत चमत्कार

कलियुगांत स्थानमहात्म्य किंवा दैवी साक्षात्कार यांची प्रचीती येणें दुर्लभ झाले आहे... मग त्याची कारणें कांहीं असोत. श्रीक्षेत्र गाणगापूर, नरसिंहवाडी येथें असलेल्या श्रीदत्ताच्या स्थानी जे साक्षात्कार होत असत जें दृक्‌प्रत्यय अनुभवाला येत असत, ते दिवसेंदिवस कमी होत आहेत, पण या शिंगणापूरच्या शनिदैवताची सत्ता प्रत्ययास आणणारा अद्‌भूत चमत्कार म्हणजे शिंगणापूर येथील एकाही घराला चौकट किंवा दारें नाहींत ! इतकेंच नव्हे त्या परिसरांतील कोणत्याही घरांत कपाट, कडी, कुलुप लावायचें नाहीं, अशी शनीमहाराजांची आज्ञा सक्त आहे, व तिची अम्मल बजावणी तेथील रहिवाशी अत्यंत कसोशीनें करीत आले आहेत. या परिसरांत 'चोरी होत नाहीं' चोरी करणारा चोर अं होतो, भ्रमिष्ट होऊन रस्ता चुकून दैवताच्या आसपास फिरत राहातो व चोर आपण होऊन गुन्हा कबूल करून देवाजवळ क्षमेची याचना करून मग देवाच्या कृपेनें पूर्ववत् होतो.

एकदां पाव्हणा किंवा परस्थ मनुष्य कुलुप लावलेली ट्रंक किंवा बॅग घेऊन त्या परिसरांत मुक्कामाला राहिला तर त्याला सुद्धां ते कुलुप काढून ट्रंक, बॅग मोकळीच ठेवण्याची जाणीव देवाकडून व तेथील लोकांकडून होते. एकाद्यानें दुराग्रहानें ही जाणीव न मानल्यास, त्याला थोडा फार फटका बसतोच.

थोडेसे विषयांतर करून असे म्हणावेसे वाटते कीं 'भारतीय लोक अंधश्रद्धेनें, अज्ञानानें वाटेल त्या खुळचट गोष्टीवर विश्वास ठेऊन, धर्माच्या नांवांखालीं अंधारांत चाचपडत असतात आणि त्यामुळें ते अत्यंत मागासलेले आहेत ..' असा आरोप करणाऱ्या सुधारलेल्या देशांतील लोकांना, जगाच्या पाठीवर 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीची सत्यता पटविणारे बिन दरवाजाचें, कुलुप किल्ली न वापरणारे एकादे गांव दाखवितां येईल काय ? मी तर असे म्हणेन 'जगांतले दहावे आश्चर्य' म्हणजे हे सोनई जवळील 'शनिदेवाचें शिंगणापूर' होय.

'Mother India' लिहून भारतीय लोकांची नालस्ती करून कुप्रसिद्ध पावलेल्या 'मिस मेयो' बाईंना द्वारहीन घरे, कुलुपकिल्ली न वापरणारे लोक पाहाण्याची संधी दिल्यास 'The holy India' असें पुस्तक लिहिण्याचीच त्यांना स्फूर्ति होईल.

## या नंतर दुसरा एक चमत्कार

नगर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून सरकारी कागदोपत्रीसुद्धां नमुद केलेला महाराष्ट्राचा भाग आहे. एकदोन वर्षाच्या अवधीनंतर अवर्षण किंवा कमी पाऊस, ही ओरड नगर जिल्ह्यांतून कुठून तरी ऐकू येते, अर्थात नेवासे तालुक्यांतील सोनईच्या भागांत योग्य वेळीं पाऊस पडला नाहीं तर पूर्वा नक्षत्रापर्यंत पावसाची वाट पाहून, श्री शनिदेवाला सांकडे घालतात... त्याचे विशेष तंत्र व जपणूक आहे. (Rituals) त्या विधीला देवाला 'शिते लावणें' असें म्हणतात. तो विधि म्हणज– एकाद्या शनिवारी शनीदेवाच्या आसपासचे मैदान स्वच्छ करून पाणी मारतात. नंतर शनीचा चौथरा स्वच्छ धुवून काढतात. नंतर देवाला अभिषेक करून पूजा करतात. नंतर मामाभाच्याचे नाते असलेले दोन गृहस्थ... शिगणापूर येथील वस्तीपैकीं– यांनाहि स्नान घालून, उपवास करायला लावतात. संध्याकाळच्या सुमारांस पुन्हां या जोडीला आंघोळ घालुन, देवाजव एकमेकासमोर उभें करतात. वाद्ये वाजवून टाळमृदुंगाच्या नादावर शनि–देवाचा नामघोष मारखा चालूं ठेवतात–यानंतर तेथील एका ओरीत रहाणारे साधू (पूर्वी उदोसी बाबा म्हणून २५ वर्षे शनिमहाराजांच्या सान्निध्यांत रहात असत. ते एकदोन वर्षापूर्वीच दिवंगत झाले) स्नान करून मूर्तीजवळ बसतात... मामाभाचे यांना ओल्या वस्त्रानिशी एकमेका–समोर उभे करतात. प्रत्येक जण सुमारें तीन फूट लांब असलेल्या दोन बांबूच्या कामठ्या आपल्या कमरेला लावून त्या दोन्ही बाजूंनीं दोन्ही हातांनीं सरळ समांतर धरतो. नंतर नामघोष थोडा वेळ थांबवून ते साधू महाराज नक्षत्रांची नांवे घेऊन देवाला विचारतात––

'या नक्षत्राचा पाऊस पडेल कां ?' 'त्या नक्षत्रांत पाऊस पडेल' असें उत्तर असेल तर त्या दोन्ही कामट्या (मामाभाच्यांच्या) जवळ जवळ येतात... भरपूर पाऊस पडणार असेल तर 'प्रत्येकाच्या कमरेच्या दोन्ही

## राजमल बन्सीलाल बोगावत

आमचेकडें सर्व प्रकारचें
साडीवान ठोक भावानें मिळेल.

*अवश्य भेट द्या*

---


अहमदनगरमध्यें
शाखाहारी भोजनाची व रहाण्याची उत्तम सोय

## सर्कल गेस्ट हाऊस

व्यवस्थापक – **घनश्याम गिल्डा**

दादा चौधरी रोड, वसंत टॉकिजकडें जाण्याच्या रस्त्यावर
बंगाल चौकीजवळ, अहमदनगर.

---



## श्री गोमाता सरकी केंद्र

सरकी, पेंड व चुनी
ठोक व किरकोळ योग्य भावांत मिळेल.

**श्रीगोमाता दूध केंद्र** आमचें येथें म्हशीचें निर्भेळ दूध मिळेल

तसेंच **गावराण तंबाखूचे** ठोक व किरकोळ व्यापारी.

चितळे रोड, सुभाष चौक, अहमदनगर.

## उत्तम एकनाथ सुपेकर


**सारडा गल्ली, अहमदनगर.**

आमच्याकडे हातमाग व पावरलूम पातळे लुगडी
त्याचप्रमाणें फेटे व खणाळे ठोकबंद भावानें
व अत्यंत किफायतशीर भावानें मिळेल

**एकवेळ अवश्य अनुभव घ्यावा.**

---

४१८, बुधवार पुणें २ — ८३२, डी. एम. रोड पुणें १




## एफ. होमी

चष्म्यांचे कारखानदार व विक्रेते

गव्हर्नमेंट, म्युनिसिपल कॉंट्रॅक्टर्स

**माईचें विठ्ठल मंदिरासमोर, डांगे गल्ली, अहमदनगर.**

---



**— नगरमधील सर्वांत जुनी व सुप्रसिद्ध —**

## हनुमान छाप

**विडीचीच**

नेहमी मागणी करा

**प्रो.— हणमंत शिवराम भाडेप ॲण्ड सन्स**

चितळे रोड, अहमदनगर.

कामटचा एकमेकांना चिकटतात ' आणि मग नामघोषाच्या जयजयकारांत सर्व लोक भक्तिभावानें देवाला नमस्कार घालतात... आणि त्या नक्षत्रांत खरोखर पाऊस पडतो. गेल्या वर्षी 'पूर्वा' नक्षत्र येईतो सोनईला अजिबात पावसाचा थेंब नव्हता. शनिदेवाला वर सांगितलेल्या पद्धतीनें कौल लावला आणि पूर्वा व हस्त नक्षत्रांत भरपूर पाऊस पडुन दुसरें पीक भरघोस आले. पाऊस पडणार,नसेल तर बांटाच्या चिमटीत धरलेल्या कामटचा अगदी सरळ असतात... बिलकुल वाकत नाहींत की जवळ येत नाहींत .. हा चमत्कार शिगणापूरला, नगर जिल्ह्यांतील अवर्षण काळीं केव्हांही पाहायला मिळतो. अर्थांत हे देवस्थान अत्यंत जागृत, नवसाला पावणारे, रक्षण करणारे आहे याबद्दल ऐतिहासिक पुराव्यासाठीं जुनी दप्तरे, बखरी, कागद-पत्रें चाळण्याची जरूरी नाही.

## चक्षुर्वै सत्यम्

हेंच प्रमाण, परदेशी पाव्हण्यांचें एकादे (Cultural Mission) सांस्कृतिक मंडळ भारतांत आल्यास त्यांना भारताला मिळालेल्या शिल्प-कलेच्या वारसदारी सौंदर्याच्या जोडीला 'No lock, No key No doors ' असें हें छोटेंसे गांव दाखविल्यास हिंदु धर्मातील देवतांच्या सामर्थ्याची, दैवी शक्तिची बरोबर कल्पना येऊ हिंदु धर्माची महती वाढेल.

## यानंतर सर्पदंश

शिगणापूरच्या परिसरांतच नव्हे तर आसपासच्या पंचवीस तीस मैलांतील गांवांत जर कुणाला 'पान लागले ' तर त्या व्यक्तिला शनि-देवापाशी आणून ठेवल्यास, वीष उतरून ती व्यक्ती खडखडीत बरी होते. (मिरज स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर एक लिंबाचे झाड असून त्याला दोरीनें बांधलेले दगड, ' आडी गुडी इमामसाहेब ' या मंत्रानें सर्पदंश उतरणारेच आहेत हे पुष्कळांना माहित आहे.) या ठिकाणीं केवळ देवाचे सानिध्य हाच तोडगा ठरून, याचा अनुभव पुष्कळांना आलेला आहे. सोनई येथील एक शेतकरी श्री. नामदेव पांडूरंग दरंदले यांची सून चार वर्षांपूर्वी, भाऊबंदांच्या घरी कांहीं पदार्थ देऊन परत येत असतां वाटेंत तिला सर्पदंश झाला. घरी येऊन ती हकीगत सांगता सांगतांच, ती बेशुद्ध होऊन पडली,

लागलीच मंडळी जमा होऊन, त्यांनी तिला, शनीचा नामघोष चालू ठेवला शिंगणापूरला देवाजवळ आणून ठेवले .. ती तशीच बेशुद्धावस्थेंतच होती. लोकांनीं रात्रभर नामघोष चालू ठेवला... पहाटे पांचच्या सुमारांस ती शुद्धीवर येऊं लागली. व अर्ध्या तासांत पूर्ण बरी होऊन चालू बोलू लागली ' तीं बाई अद्याप हयात आहे;'

## देवनिंदा व प्रायश्चित

शनिदेव हें दैवत श्री शंकराप्रमाणें सौम्य नसून अत्यंत जहाल आहेत, याबद्दल शनिमहात्म्यांत अनेक कथा सांगितल्या आहेत—

रक्षि रक्षि प्रभो नृप वक्रगति अनिवार
पातली ज्ञानेश्वरी बाजार ॥
ठक सौदागर ठकविल करूनि बारूवरति स्वार ।
विक्रमा, दाविल यमदरबार ॥

हीच कथा आबालवृद्धांच्या परिचयाची आहे तसेच अनुभव शिंगणापूरच्या दैवतानें पुष्कळांना दिलेले आहेत– (१) जत संस्थानमधील एक बडे श्रीमान व्यापारी श्री. जेठाभाई कांही भाविक लोकाच्या आग्रहावरून शिंगणापूरला गेले, त्यांनीं ती पाषाणाची निराकार मूर्ति पाहून ही कसली मूर्ति ! कसला देव ! या मूर्तीच्या पाया हे लोक वेड्यासारखें कसें पडतात पूजा काय करतात वगैरे निंदास्पद उद्‌गार काढून ते पाया न पडता परत आले. आपल्या मोटारींत जाऊन बसतांच त्याचा नाकाचा शेंडा काळा झाला... इतर लोकांनीं ही गोष्ट त्यांच्या निदर्शनाला आणली, कांहीं तरी काळं नाकाला लागले असेल म्हणून त्यांनीं धोतरानें नाक पुसले पण तें काळं कांहीं पुसले गेले नाहीं. बांबोरीपर्यंत जातात तो काळा डाग वाढतच गेला. घरीं पोहोंचले तो त्यांचें सर्व अधिक तोंड काळे झाले. पुष्कळ धूचोळ केली. अखेर डॉक्टरांचें औषध चालू केले, इंजेक्शनस् घेतली, परंतु कांहीं उपयोग झाला नाही: चिंतामग्न स्थितींत त्यांना शिंगणापूरनजीक मोटारीत बसतांना नाकाला काळे लागल्याचे कुणी तरी सांगितल्याचें स्मरण झाले, व लगेच शनिदेवाबद्दल आपण उपहासाची भाषा वापरली हें आठवले.

भेंट देण्यासाठीं —

स्टेनलेस स्टील व इतर सर्वप्रकारच्या वस्तु

**सुरेख संगम**
**घासगल्ली अहमदनगर.**

या ठिकाणीं
भरपूर प्रमाणांत
मिळतात.

॥ श्री ॥

## पांडे आर्ट स्टुडिओ

महात्मा गांधी रोड, अहमदनगर.

कोणत्याहि जुन्या फोटोवरून एन्लार्जमेंट, ऑईल पेंट,
वॉटर कलर करून मिळण्याचे एकमेव ठिकाण

**अमृतलाल सीमरतमल चंगेडे** ★ ★
तेलीखुंट अहमदनगर.

उंची, भारी अगरबत्ती तसेंच फेपरमीठ व बिस्कीट
रबरी फुगे, तपकीर मिळण्याचें ठिकाण

★ ★ ★ ★ **न्यु चंगेडे स्टोअर्स**

सुप्रसिद्ध **महेंद्र पेढावाला** अहमदनगर.

प्रोप्रा. महेन्द्र खेतसी

आपल्या मंगलप्रसंगीं उत्तम व खात्रीशीर

**— पेढे तयार करून मिळेल —**

सर्व प्रकारचा खारा मालहि ताजा मिळेल.

भेटण्याची वेळ व ठिकाण :—

सकाळीं ७ ते ३ सिटी लायब्ररीसमोर, चितळे-रोड

सायंकाळीं ८ ते ११।। कोहिनूर क्लॉथ स्टोअरजवळ.

॥ श्री साईनाथ कृपा ॥

**श्री जयनारायण पुष्पकला भांडार**



प्रोप्रायटर — एन. एस. तांबे

फ्लॉवर कमिशन एजंट

चितळे रोड, अहमदनगर

॥ श्री मार्कंडेय प्रसन्न ॥

★ ★ **उमा पातळ डेपो** ★ ★

हातमाग पातळाचें ठोक व किरकोळ व्यापारी

**छाया टॉकिज समोर, अहमदनगर.**

श्री शनिदेवाचाच हा चमत्कार असावा अशी जाणीव होऊन, ते गृहस्थ शिगणापूरला आले .. देवाची पूजा, अभिषेक यथासांग करून, त्यांनीं देवाची क्षमा मागितली .. तिथेंच तोंडावरचा डाग कमी होऊं लागला. घरीं जाईतो तो पूर्ण नाहींसा झाला

(२) मौजे मालुंजे गांवचें श्री. औटी हे नेवासे येथें मामलेदार होते. ते गेल्या महायुद्धांत ' युद्धकर्ज व निधी ' चा प्रचार करण्यासाठीं सरकारी हुकुमावरून शिगणापूरला आले. लोक त्यांना फार भीत असत, ' युद्ध फंड ' द्यावाच लागेल या भितीनें सर्व गांवकरी रानांत निघून गेले. चार पांच हजर होते .. ते देवापुढेंच बसले होते. मामलेदारसाहेबांनीं ' या काळ्या देवाला भजून हे लढाईचें अरिष्ट ट णार नाहीं. तो पाषाण काय करणार मी गोऱ्या देवाचा भक्त आहे. तुम्हीं ' युद्ध कर्ज द्या ' निधि द्या... हें लढाईचें संकट गोऱ्या देवालाच प्रसन्न करून घेऊन निवारण होणार आहे ' तेव्हां गांवकऱ्यांना सांगून पाटला बरोबर नांवनिशीवार रक्कम तालुक्याला पाठवून द्या, असे बजावून स्वारी तेथून निघाली. ते घरीं आल्यावर त्यांच्या पाठीवर चार इंच जागेंत एक मोठा काळा फोड आला व ते त्याच्या आगीनें हैराण झाले. पुष्कळ डॉक्टरांनीं उपाय केले. शनीचा कोप झाला असें कोणी त्यांना सांगितले. बारा महिने उपाय चालूंच होते अखेर ते शरमिंदे होऊन शिगणापूरला आले. देवावर अभिषेक करून पूजा करून क्षमेची याचना केली, तेव्हां तो फोड बरा झाला.

(३) सोनई येथील श्री. शंकरराव आण्णासाहेब राजहंस हे कुलकर्णी होते. सरकारी कामासाठीं ते एकदां शिगणापूरला गेलें. देवाची पूजा चालू होती तेव्हां त्यांचे काम तोपर्यंत अडून पडले. ' हे अडाणी लोक कसली पूजा करतात, शीळा वाहून येते काय, तिला शनीदेव काय मानतात.' वगैरे शब्दांनीं त्यांनीं देवाची अवहेलना केली... त्यांना काम करता आले नाहीं. अंगांत ताप चढला .. बोलता येईना .. पुढें घोडेगांवला जाणार होते तेथें जाण्याची अंगांत शक्ति नाहीं. अशी एकदम स्थिति झाली, घरी परत आले तो त्यांची बोबडी वळली .. तोंडांतून शब्द निघेना. त्यांनीं पुष्कळ उपचार केले पण गुण आला नाहीं. त्यावेळीं सोनई येथें असलेले पोलीस सबइन्स्पेक्टर श्री. प्रल्हाद मनोहर अतीतकर

(हे हयात आहेत) यांनीं शनीदेवाची क्षमा मागण्याचा सल्ला दिला. पांच शनिवारी देवाचे दर्शन घेण्याचें कबूल करून त्यांनी शनिरायाची क्षमा मागितली. नंतर ते पूर्ववत् बोलूं चालूं लागले.

## आज्ञाभंग व त्याबद्दलची जाणीव

कोयंडा, कडी, कुलुप वगैरेचा त्या परिसरांत वापर करायचा नाहीं याबद्दल देवानें एकदांच निक्षून सांगितले आहेत. तरीसुद्धां, चुकून त्याचा वापर केल्यास, काय होईल त्याबद्दल ताकीद कशी मिळाली याची एकदोन उदाहरणें दिल्यास वाचकांची खात्री पटेल– चार वर्षापूर्वीच ही गोष्ट झाली. सोनई येथील प्रसिद्ध शेठ श्री. हनमंतराम हिरानंद बंग यांचा मळा देवाच्या शिंगणापुरी आहे. त्यांच्या गड्यांनीं, त्यांच्या पश्चात् मळ्यामध्यें भाकरी कालवण ठेवण्यासाठी एक कडी कुलुप असलेली लाकडी पेटी सकाळीं मळ्यांत आणून ती कडब्याच्या खोलीत ठेवली. त्यांतील कडबा बैलांना घातला. त्याच दिवशीं ४ वाजतां सर्व २० च्या २० बैल एकदम फुगले, खाणेंपिणें सोडून विव्हळ झाले. आतां काय करावें या फिकिरीत असतांना शेजारचा मळेकरी आला, त्याला सर्व हकीगत कळल्यावर, त्यानें कडी कुलुपाची चौकशी केली व लगेच त्यानें कडी कुलुप काढून ती पेटी देवा–जवळ नेली. शनीदेवाचा अंगारा बैलांना लावून, नामघोष चालूं ठेवला. पांच वाजेपर्यंत सर्व बैल सुधारून पूर्ववत झाले.

शनिदेवाच्या स्थानापासून सुमारे २०० यार्डावर, झाडीत एक दत्ताचें स्थान आहे, त्यावर औदुंबराची छाया आहे. त्या ठिकाणीं तेली जातीचा एक साधू नगरहून आला, तो तिथें पूजा अर्चा करून राहूं लागला. मधून तो नगरला जात येत असे. नगरहून इकडे येतांना त्यानें एक पेटी आणली, त्यांत औषधें होती म्हणून त्याला त्यानें कुलुप घातले. रात्रीं त्याला एक उशाशी व एक पायथ्याशी असे दोन काळे सर्प त्याला दिसले. रात्र मोठ्या फिकिरीत काढून सकाळीं त्यानें ही हकीगत लोकांना सांगितली, मग त्यानें ती पेटी कुलुपासह सोनईला ठेवली व तेथून नगरला पाठविली.

## चौर्यकर्म व त्यास दैवी प्रतिबंध

' दारे, कड्या, कुलुपे ही नाहींत, यावरून शनिदेवाच्या परिसरांत, चोरी होत नाहीं, हे सत्य आहे; पण कांहीं आधुनिक शर्विलकरांनीं, पैज

मारून, चोरी करण्याचा चंग बांधला, हे चोर सराईत होते. वोडेगांवच्या जवळ राहात असत. एक सुखवस्तु शेतकरी एकरंगी एक शिंगी बैलांची जोडी आपल्या गाडीला जोडून दर्शनासाठीं शिंगणापूरला आला. शेतकरी गाडी सोडून, झाडाला बैल बांधून मुक्कामाला एका मित्राकडे गेला. त्याच्यावर निघाल्यापासुन पाळत ठेवून चोरही तेथें आले. रात्रीं बारा वाजून गेले. जिकडे तिकडे सामसूम झाली या चोरांनीं हळूंच बैल सोडले आणि एका रस्त्यानें सोनईकडे म्हणून चालविले, ते तिघे बैलासह चालतच राहिले. जवळ जवळ पाच वाजले, चालून चालून थकले .. आपण कित्येक मल लांब आलो असे वाटून त्यानीं ते बैल एका झाडाला बांधून तेथेंच अंग टाकले. तीन चार तास चालल्यामुळें पडल्याबरोबर त्यांना झोंप लागली. सकाळ झाली .. लोक आपापल्या उद्योगाला लागले, तरी हे उघड्यावर घोरत पडले होते. गाडीचा मालक जाण्याची तयारी करून बैल जोडण्यासाठीं पहिल्या झाडाजवळ आला तो त्याला बैल सोडून नेल्याचे कळले. शोधाशोध सुरूं झाली. आसपासच्या वस्त्यांत माणसे पाठवून, बैल सुटून कुठें गेले की, काय हेहि पाहिले. अखेर त्यांच्यापैकीं एक माणूस शोधतां शोधतां शनिदेवापुढील मैदानांतून शंभर दिडशे यार्डावर आला, तो त्याला बैल एका झाडाला बांधलेले व जवळच तीन माणसें झोपलेली दिसली; लगेच त्यानें मालकाला बोलावणें पाठवून बैल सांपडल्याची वर्दी दिली. बैलांच्या मालकाबरोबर गांवकरीही आले. त्यांनी त्या लोकांना उठवून, विचारपूस केली, तेव्हां ते अत्यंत शरमिदे होऊन, प्रांजलपणें त्यांनीं गुन्हा कबूल करून, त्यांची क्षमा मागितली.

‘ १०।१२ मैल आपण लांब आलो आहोंत, या समजुतीनें, थोडी विश्रांती घ्यावी, या हेतूनें बैल झाडाला बांधून, थोडे आडवे झालो तो अजिबात जाग आली नाहीं. आम्हीं पैज मारून चोरी करण्यासाठीं आलो होतो, पण देवानें आम्हाला चक्रांत घालून रात्रभर इथेंच फिरवून आमच्या नाकांत दम आणला... वण वण हिंडून पुन्हां इथेंच. हें ऐकून, मालक व व गांवकरी थक्क झाले, शनिदेवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या त्या चोरांना त्यांनीं देवाच्या दर्शनाला नेले. देवापुढे नांकदुऱ्या काढून त्यांनी क्षमेची याचना केली. गांवकऱ्यांनीं त्यांना दोनप्रहरी जेवायला ठेवून घेतले. आणि त्या मालकानें त्यांना फेटे बांधून सन्मानानें त्यांची बोळवण केली.

याच्यापेक्षांहि महत्वाची एक घटना, शिंगणापूर येथील वतनदार ‘ वानकर ’ घराण्यांतील एका वृद्ध गृहस्थानें स्वानुभव म्हणून सांगितली

नगर जिल्ह्यांत ' काळू भिल्ल ' म्हणून एक प्रसिद्ध दरोडेखोर- (हल्ली हयात असून, पोलीसांचे गोळीनें पाय अधू झालेल्या स्थितींत आहे ) यानें जिल्ह्यांत व विशेषत. नेवासे तालुक्यांत त्यानें दरोडे घालुन, भयकर दहशत बसविली होती. तो मागेल ते लोक त्याला देऊन, लोक आपला बचाव करीत. रझाकारांच्या चळवळींत तो रझाकार झाला, आणि त्यानें अनेक दरोडे घालून, भलताच धुमाकूळ घातला. आपल्या कांहीं साथीदारा- सह तो एकदां अचानक शिंगणापुरी आला आणि त्यानें बानकर, शेटचे वगैरे प्रमुख शेतकऱ्यांना दम भरून. भल्या मोठ्या रकमेची मागणी करूं लागला. देवाची भिती त्यालाहि थोडी फार होती, म्हणून ' तुम्हां रक्कम गोळा करून माझ्यापुढें ठेवा म्हणजे मी कांही हाणामार न करता, परत जातो.' कांहीं लोक पुढचा घोर प्रसंग टाळण्यासाठीं रक्कम जमा करण्याच्या खटाघाटी करूं लागले, पण बानकर घराण्यातील एका वृद्ध गृहस्थानें काळूला बोलावून 'आमच्या घराला दरवाजे नाहींत, कुलुप किल्ल्या नाहींत तेव्हां तुला लागेल ते आपल्या हातानें घेऊन जा ' हणामारीची भाषा ' आम्ही तुला आडवल्यानंतर काहीं देत नाहीं असें म्हटल्यानतर काढ. आमचा सगळा व्यवहार उघडा आहे ' काळूला विचारच पडला तरी पण दम देऊन ' मुकाट्यानें रकमा आणा ' मी आज जवळच मुक्कामाला आहे. सकाळीं रक्कम घेऊन अमक्या ओढ्याच्या वर या ' असे म्हणून काळू टोळीसह चालता झाला. रात्रीच त्याला स्वप्नांत, भोंवती दोन काळे सर्प वळवळ असल्याचे दिसलै. जास्त धाडस करुन गोता बसेल असे वाटू तो टोळीसह चालता झाला.

अशा प्रकारच्या अनेक घटना तेथील लोक सांगतात पण विस्तारभया- मुळें त्या लिहितां येत नाहींत. पण संकलित केलेल्या सर्व माहितीचे सार ' शनिदेवा ' चे हे स्थान अत्यंत जागृत असून स्वयंभू आहे.

## या नंतर थोडी तांत्रिक माहिती

शिंगणापूर ही वाडी आहे व ती इतर बारा बाड्याप्रमाणें सोनईच्या ग्रामपंचायतीच्या ताब्यांत आहे. त्याप्रमाणें तेथील वसूल वगैरे दिवाबत्ती ही कामें सोनईची ग्रामपंचायत पाहते. शनिवारीं अमावास्या आल्यास शिंगणापूर येथें मोठी यात्रा भरते. दिडदोनशें मैलांवरून भाविक लोक येतात, व शनि- देवाला सारखे अभिषेक होत असतात. हजारों नारळ फुटता. नारळाचो

किंमत बारा आण्यापर्यंतही जाते. पांच पंचवीस तेल्यांची दुकाने असून तेल, मूर्तीला वाहण्याची पद्धत आहे. बिल्वा, कवडी व तांबडी फुलें, ही प्रामुख्याने वाहिली जातात. या दिवशी ग्रामपंचायतीचे अधिकारी, माणशीं एक आणा कर वसूल करतात व त्यांतून यात्रेकरूंच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात व रस्ता दुरुस्ती, ग्रामसफाई ही कामे करतात.

चैत्री पाडवा, श्रावणातील प्रत्येक शनिवारी भाविक लोक कावडी वाहून शनिदेवाला स्नान घालतात. नेवासे गांवानजीक गोदावरी व प्रवरा या नद्यांच्या संगमातील पाणी हे लोक कावडीनें वाहून चालत येतात यांना फारच श्रम पडतात, पण त्यांच्या भक्तीमुळे ते या श्रमाची परवा करीत नाही

देवाची मिरवणूक पालखी छबिना असला डामडौल मंजूर नाहीं गांवकरी टाके, खंजिरी व एकतारीवरील भजनी मंडळें शनिवारी देवापुढें भजन करतात.

कोणी वर्गणी करून भंडारा घालून, गोरगरिबांना, आल्यागेल्यांना अन्नदान करतात. एके वर्षी एका भंडाऱ्यांत 'वीस हजार' पान झालें. बांधलेले लाडू व पिण्याचे पाणी ( विहीर थोडी आटलेली होती ) यांचा पुरवठा कसा होईल या फिकिरीत गांवकरी व व्यवस्थापक होते. शनिदेवाचा नामघोष व प्रार्थना कांहीं लोकानी करण्यास सुरुवात केली माणूस अर्धपोटीं उपाशीं जातां कामा नये हीच एक प्रार्थना आणि देवकृपा म्हणा किंवा प्रत्यक्ष अन्नपूर्णा अन्न वाढायला लागली असे म्हणा लाडवांचा अगर पिण्याच्या पाण्याचा तुटवडा तर पडला नाहींच पण शेवटची पंगत उठल्यावर सुद्धां लाडू शिल्लक राहिले व ते गांवकरी लोकांनी वाटून घेतले.


देवाला उत्पन्न इनाम जमीन वगैरे कांहीं नाहीं. उदासी बाबा म्हणून जे देवाजवळ होते. त्यांनीं गांवठाणांतील एक एकर जमीन फुलपत्रीसाठी देवाला मिळालेल्या पैशांतून विकत घेतली आहे. पूजा गुरवाची असे पण हे बाबा तेथेच वास्तव्य करीत व तेच नियमितपणें यथासांग पूजा करीत. आतां त्यांच्या पश्चात आणखी कोणीतरी साधू तेथें येऊन राहिले आहेत. तेच पूजा वगैरे करतात.

स्त्रियांनीं देवाच्या चौथाऱ्यावर जायचे नाहीं. पूजा नाहीं. फक्त खालीं उभें राहून दर्शन घ्यावे असा नियम आहे.

यात्रे दिवशीं हजारों लोक येतात. पूजा अर्चा करून नारळ फोडून घरोघर जातात मुक्कामाला कोणी विशेष रहात नाहीं यात्रेकरूसाठीं एखादी धर्मशाळा वगैरे कांहीं नाहीं. गांवकरी लोक देवाजवळ पाणी, पक्की गटारे, धर्मशाळा वगैरे कोणत्याही सुधारणा करूं इच्छित नाहींत. शनीदेवाजवळ पडणारे पैसे त्या ओरींत असणारे ' बाबा ' व गांवकरी पंच वांटून घेत असावेत याबद्दल गावकरी लोकांनीं विशेष खुलासा करण्याचे टाळले. भजन दर शनिवारी असते, त्यावेळीं गांजाही ओढला जातो. व ' चहाची पातेली ' उतरली जातात असें म्हणतात पण देवापुढील मिळकतीचा योग्य सदुपयोग होत असेल असें वाटत नाहीं.

पाच सहा वर्षांपूर्वी, सोनईच्या रहिवाशांच्या विनंतीवरून ' अहमद-नगर एज्यु. सोसायटी ' या नामवंत शिक्षण संस्थेनें ' श्री शनीश्वर विद्या-मंदिर ' या नांवाची इंग्रजी शाळा काढून ती ११ वी पर्यंत वाढविली आहे. एस. एस. सी परिक्षेला यंदा ४० विद्यार्थी बसणार आहेत. ही तिसरी बॅच आहे. शाळेंत २५० मुलें आहेत व शाळेची शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती फार समाधानकारक आहे. पण देवाच्या पण देवाच्या नांवानें काढलेल्या या संस्थेला अद्याप स्वतःची इमारत बांधतां येण्याजोगी आर्थिक स्वायत्तता मिळाली नाहीं. गावकरी लोकांनी इमारतीचा संकल्प करून तीन-चार वर्षे झालीं ' शनिदेवाची कृपा ' झाल्याशिवाय इमारत उभी राहिल असे दिसत नाहीं. अनंत हस्ते, हें सुभाषित खरें असेल. देवाचा कृपा प्रसाद झाला तर हां हां म्हणतां दगडांना मंदिराची शोभा प्राप्त होईल आणि देवाच्या नांवा-खालीं सुरूं केलेल्या संस्थेला योग्य व कायम स्वरूप येईल.

अच्छी और सस्ती खादी
मिलनेका स्थान
महाराष्ट्र
खादी भांडार
शहाजी रोड, अहमदनगर.




20301

REFBK-0020309